# || प्लास्टिक प्रदूषणाशी लढा ||

या वर्षी जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना "प्लास्टिक प्रदूषणाशी लढा" अशी आहे. त्या दृष्टीने आपण करीत असलेला हानिकारक प्लास्टिक वस्तूंचा वापर प्रामुख्याने थांबवणे आणि त्यावर कडक स्वरूपाचे बंधने आणणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. आपण सर्वच नागरिकांनी याचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

आपल्याला स्वस्त निरोगी आणि प्रदूषणमुक्त आयुष्य जगायचे असेल तर आजूबाजूचे पर्यावरण नेहमी स्वच्छ असणे आणि स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने दरवर्षी प्रयत्न केले जातात.शासकिय/प्रशासकीय पातळीवर दिवस साजरा होतोच . एक प्रश्न सतत मनात येतोच, की असे दिवस साजरे करून पर्यावरणाच संवर्धन होणार आहे का?

५ जून हा दिवस "जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो .तो पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करुन, समस्या जाणून घेवून पर्यावरणाची गुणवत्ता वाढावी म्हणून पोषक वातावरण निर्माण करणे हाच पर्यावरण दिन/दिवस साजरा करण्या मागचा प्रमुख हेतु आहे. पर्यावरणाचा ऱ्हास का होतो? पर्यावरणाचे संतुलन का बिघडते ह्याला आपण किती जबाबदार आहोत ? निसर्गातील बदल, अनियमितपणा किती कारणीभूत आहे ?, ह्याचाही विचार करावा लागेलच. खरं म्हणजे, पर्यावरण आणि प्रदूषण ह्याचा खूप जवळचा संबंध आहे. अनेकविध प्रकारच्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास प्रामुख्याने होत असतो.मग निसर्ग निर्मित असो वा मानव निर्मित असो, ह्याचा विचार करणे गरजेचे आहे.निसर्ग निर्मित कारणांमुळे होणाऱ्या कारणावर आपण काय करणार? ती एक प्रकारची आपत्तींच असते.पण आपल्या कडून ज्या ज्या कारणांमुळे प्रदूषण निर्मिती होते ती आपण नक्कीच कमी करु शकतो. पर्यावरणाचा समतोल न राहण्याचे प्रदूषण हेच महत्वाचे कारण कसे आहे हे बघू, आणि आपला सर्वसामान्य माणसाचा त्याच्याशी काय संबंध आहे, आपण काय करु शकतो, काय करत नाही. हे पहाणेही उचित ठरेल. तसेच शासकिय/प्रशासकीय पातळीवर काय करता येईल, काय होत नाही, तेही बघायला लागेल.




पृथ्वीवरील जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण होणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. हाच या मागील हेतू आहे .पर्यावरणाचा ऱ्हास मुख्यत्वे अनेकप्रकारचे प्रदूषणाने होतो .प्रदूषण कोणत्या कोणत्या मार्गाने कसे कसे होते आणि कोणा मुळे होते यावर नियंत्रण हवे.. वायू प्रदूषण/हवेतून होणारे. ध्वनि प्रदूषण, जलप्रदूषण, जुनी इलेक्ट्रिक उपकरणे, प्लास्टिक कचरा, वातावरणातील बदलाने.निर्मिती होणारे पर्यावरण अर्थातच निसर्ग निर्मित प्रदूषण.

प्लास्टिकचा कचरा, जुनी इलेक्ट्रिक उपकरणे फेकून दिली जातात, ते नष्ट होत नसतात, प्लास्टिक पिशव्या वापरावर बंदी येऊनही सर्रास वापर सुरू आहे.आपल्याला तर ते घातक आहे, तसा जनावरांनाही, तो खाऊनही हज्जारो जनावर मृत्यमुखी पडतात.पशुधनातून नष्ट होते. मोठ्या मोठ्या शहरात रस्त्याच्या दुतर्फा पडलेले कचऱ्याचे ढीग आपण पहातोच. हा कचरा अनेक दिवस पडल्यामुळे सडून त्यातून विषारी वायूची निर्मिती होते आणि नकळत यातूनच रोगांचा प्रादुर्भाव होतो. याबाबतीतही कडक धोरण अवलंबून कारवाई व्हायला हवी आहे. गेल्या काही दशकांपासून, प्लास्टिक प्रदूषण जगाच्या कानाकोपऱ्यात शिरले आहे, आपण पितो त्या पाण्यात, खाल्लेल्या अन्नात आणि आपल्या शरीरातही ते शिरत आहे. प्लास्टिक प्रदूषण ही एक मोठी चिंता असली तरी, ती आजच्या पर्यावरणीय आव्हानांपैकी एक आहे, ज्यावर काही स्पष्ट उपाय उपलब्ध आहेत.त्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

दैनंदिन जीवनात आपण भाजीपाला, किराणा वस्तू, दूध, कपडा, कुल्फी आईस्क्रीम गाडीवर, पुस्तकाचे दुकानात, प्रवासात प्लास्टिक पिशव्यांचा वापर अगदी सहजपणे करत असतो. मग त्या पिशव्यांची जाडी किती मायक्रोन ची आहे हे पाहायला कोणालाही वेळ नसतो कारण जीवन गतिमान झाले आहे. तसेच फ्रिज मधल्या बाटल्या. प्रवासात आपण घेतो त्या पाण्याचे बॉटल्स हे सर्व वापरतो आणि त्यानंतर ते अगदी सहजपणे कचऱ्यात टाकतो. या कचऱ्यापासून विषारी वायू निर्माण होतोच पण अन्ना बरोबरच त्या पिशव्याही जनावरे खातात आणि दरवर्षी हजारो ने पशुधन नष्ट होते. देवस्थान , पर्यटन स्थळे, मोठमोठे हॉस्पिटल्स, यास कारणीभूत ठरतात. अनेक प्रकारच्या प्लास्टीकचे वस्तूंचे विघटने होत नसते. त्यामुळे आपण मोठ्या शहरात बघतो शहराच्या बाहेर जे कचरा डेपो असतात तिथे प्रचंड प्रमाणात प्लास्टिकच्या वस्तूंचा खच पडला असतो. तसेच बऱ्याच वेळा पाण्याचे स्त्रोत असतात त्या ठिकाणी या वस्तू टाकल्या जातात आणि ते पाणी दूषित होते आणि प्रदूषण होते.आपल्या देशामध्ये फार मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक निर्मिती होत आहे. हजारो युनिटमध्ये लाखो लोकांचा रोजगार असतो आणि त्यामुळेच या गोष्टीकडे दुर्लक्ष होते असेही म्हणावे लागेल. आता तर सिंगल प्लास्टिक वापरास बंदी करण्यात आली आहे. प्लास्टिकचे कप, ग्लास, प्लास्टिकचे चमचे, केक कापण्यासाठी वापरात





येणारी सूरी, चॉकलेट आईस्क्रीम साठी वापरण्यात येणाऱ्या कांड्या , सजावटीसाठी वापरण्यात येणारे पॉलीस्ट्रीन, मिठाई साठी वापरण्यात प्लास्टिकचे डबे, 75 मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या याचा सर्व वस्तूंचा समावेश आहे. अशा वस्तूंवर बंदी आली असती तरी बऱ्याच प्रमाणात दुर्लक्ष आहे. तेव्हा प्रत्येकाने आपली जबाबदारी म्हणून अशा या घातक प्रदूषणाकडे लक्ष देऊन प्लास्टिकचा वापर बंद करणे आवश्यक आहे शासनाची जेवढी जबाबदारी आहे तेवढीच आपली ही आहे ।आपल्या बेजारपणामुळेच हे प्रदूषण वाढणार आहे. बऱ्याच ठिकाणी प्लास्टिक कचरा विघटनाच्या यंत्रणा उभारण्यात आलेली आहे परंतु ती पुरेशी नाही. त्यात योग्य प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमातून स्वयंसेवी संस्थांकडून शिक्षण संस्थातून याचा प्रसार व्हायला हवा आहे. तसेच प्लॅस्टिकच्या वापरावर कडक बंदी आणायला हवी आहे.



पर्यावरण
दिलीप देशपांडे
जामनेर, जिल्हा जळगाव
८९९९५६६९१७

प्लास्टिक पासून होणारे प्रदूषण टाळणे आणि पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. जागतिक पर्यावरण दिन २०२५ हा ५ जून २०२५ रोजी "प्लास्टिक प्रदूषणाशी लढा" या थीमवर केंद्रित होऊन साजरा केला जाईल . या वर्षीचा कार्यक्रम प्लास्टिक कचरा निर्मूलनाच्या तातडीच्या गरजेवर लक्ष केंद्रित आहे, ही एक व्यापक पर्यावरणीय समस्या आहे जी जगभरातील मानवी आरोग्यावर परिणाम करते. निसर्गातील अर्थातच वातावरणातील बदलाचा पर्यावरणाचा समतोल ढासळण्यावर मोठा परिणाम होतो. निसर्गातील वादळ पावसाने हज्जारो वृक्ष कोलमडून, उन्मळून पडतात. आपण शहराचे सुशोभनासाठी, वाहतूक मार्गासाठीही अशीच हज्जारो वृक्षांची कत्तल करतो.एकीकडे वृक्षारोपण कार्यक्रम राबवतो..खूप वर्षाची वाढलेले वृक्ष नष्ट झाल्याने पर्यावरणाचा समतोल ढळतो.आक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे.प्रत्यकाने एक वृक्ष लावण्याचा, जगवण्याचा संकल्प करायला हवा.सरकारी वृक्षारोपण कार्यक्रमात पारदर्शकता हवी.नाहीतर त्याच त्या जागी दरवर्षी वृक्षारोपण केल्याच्या बातम्या आपण वाचतो. ही परिस्थिती बदलायला हवी. पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची काही मानव निर्मित, तर काही निसर्ग निर्मित कारणे आहेत. अनेक नविन शोधांमुळे जीवनात सुख आले असे म्हटले जाते. अनेक मोठ्या मोठ्या इमारती उभ्या राहिल्या, कारखाने उभे राहिले, परिणामी खूप मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली आणि त्याचाच परिणाम पर्यावरणावर झाला. मानव निर्मित कारणांनी प्रदूषण वाढून पर्यावरणाचा समतोल ढळत आहे, ती आपली सगळ्यांची जबाबदारी आहे.त्याला आपणच पायबंद घालायला हवा.प्रत्येकाने मनावर घेतले तर सहज शक्य आहे.पण तेच होत नाही. अनेक अभियान राबवली जात आहे, जसे प्लास्टिक पिशवी मुक्ती अभियान, स्वच्छता अभियान, अथिक कडकपणे राबवायला हवे. अजून बाजारपेठेत पिशव्या सापडतात, रस्त्यावर थुंकणारांचे प्रमाणात कमी होत नाही. प्रदूषण नियंत्रण महामंडळ, गावोगावच्या ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका, यांनी तसेच अभियानांची जबाबदारी ज्यांचेबर दिली आहे, त्यांनी आपले कर्तव्य, जबाबदारी आत्मियतेने पार पाडली तर हे सहज शक्य आहे.वेळप्रसंगी दंडात्मक कारवाई करायलाच हवी.ती कोणी करावी हे नक्की करायला हवे.त्यात तू तू मै मै नको. प्रत्येकाने आपल्या आजूबाजूला परिसर स्वच्छ ठेवला आणि वृक्षारोपण करण्याकडे लक्ष दिले वृक्षतोड थांबवली तर पर्यावरणाचा समतोल राखणे अतिशय शक्य आहे आणि एवढीच गोष्ट आपण करायला हवी आहे. यानिमित्ताने आपण ती करावी त्यातच आपल्या सगळ्यांचं हीत आहे हे वेगळे सांगायला नको. "येणाऱ्या प्रत्येक दिवशी आपण निसर्गाची काळजी घेतली पाहिजे .आपण सारेच या वसुंधरेचे सेवक आहोत याचे भान ठेवायला हवे.आपण कितीही प्रगती केली तरी निसर्गाची ताकत अफाट आहे.ह्याची प्रचीती येत आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, पर्यावरण स्नेही म्हणून जगण्याचा संकल्प करायला हवा. पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे, याचे भान सगळ्यांनीच ठेवायला हवे हे मात्र ह्या निमित्ताने नक्कीच सांगावेसे वाटते. पर्यावरणाचा समतोल राखणे ही सामूहिक जबाबदारी आहे आणि कर्तव्यही आहे. पर्यावरण संवर्धन किंवा संरक्षण हा एक दिवसाचा साजरा करण्याचा कार्यक्रम नसून आपली एक कायमची बांधिलकी आहे.

dilipdeshpande24@gmail.com

# अभय योजना वापरून नागरिकांना दिलासा द्यावा : आ. सुहास कांदे

**मनमाड ।** मनमाड नगरपरिषद अंतर्गत मालमत्ता कर थकबाकी मोठ्या प्रमाणात आहे मालमत्ता धारकांच्या आर्थिक अडचण किंवा इतर अनेक कारणांमुळे थकीत मालमत्ता करावर महिन्याला २ टक्के शास्ती लावण्यात येते. यामुळे थकबाकी वसुलीवर विपरीत परिणाम होऊन थकबाकीमध्ये वाढ होत असते त्याकरिता मालमत्ता धारकांना दिलासा मिळावा व मालमत्ता कर वसुली भर पडावी याकरिता नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता कारावरील शास्ती माफ करून कर वसुली करण्यासाठी नगर विकास विभाग शासन निर्णय अन्वये अभय योजना लागू करण्यात आली आहे त्यामुळे मालमत्ता थकीत करा वरील २% शास्ती माफ करून कर वसुली होने करिता जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवणे आवश्यक असते. मनमाड शहरातील मालमत्ता करात बाकी वरील शास्ती माफ करून मालमत्ता



करायची वसुली होण्याकरिता न.पा. स्तरावरून जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा अशी सूचना पत्राद्वारे आमदार सुहास कांदे यांनी मनमाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना केली आहे. १५ एप्रिल २०२५ रोजी आयोजित मंत्रिमंडळाच्या बैठकीत नगरपरिषद नगरपंचायत क्षेत्रातील मालमत्ता कारावरील शास्ती माफ करण्याच्या अनुषंगाने अध्यादेश काढण्यात आला आहे. यामध्ये नगरपरिषद नगरपंचायत क्षेत्रातील मालमत्ता कारावरील शास्ती माफ करण्यासाठी अभय योजना लागू करण्याचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

# नाईक शिक्षण संस्थेत शिक्षकांसाठी कार्यशाळा, उद्बोधन वर्गाचे आयोजन

**नाशिक ।** येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत दि. ०१ जून २०२५ रोजी संस्थेच्या मध्यवर्ती सभागृहात करण्यात आले होते.यात गणित विज्ञान व इंग्रजी ह्या विषय शिक्षकांसाठी कार्यशाळा व उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कोंडाजी मामा आव्हाड, सहचिटणीस दिगंबर गिते, विश्वस्त दामोदर मानकर, लक्ष्मणनाना जायभावे संचालक टी.एम डोंगरे, रमेश वाघ, बाळासाहेब धात्रक, सेवक संचालक विवेक गामने, शिक्षणाधिकारी ई.के भाबड, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयवंत भाबड, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रात्रे, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दरेकर उपस्थित होते. माजी प्राचार्य डॉ पी.आर भाबड यांनी इंग्रजी विषय तज्ञ म्हणून कार्यशाळेत मार्गदर्शन केले.तसेच डॉ.शरद बिन्नर, प्रतिभा घुगे, वैशाली रणदिवे यांनीही मार्गदर्शन केले.गणित व विज्ञान विषयासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून किरण



चांदगुडे, महेन्द्र आढाव, रेवण कांगणे, बाळासाहेब बोडके यांनी मार्गदर्शन केले.उद्बोधन वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना कोंडाजी मामा आव्हाड म्हणाले की, शिक्षकांनी आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे फार महत्त्वाचे आहे, त्यासाठी शिक्षकांनी सतत ज्ञान मिळवत राहिले पाहिजे व त्याचा आपल्या अध्ययन अध्यापनात उपयोग केला पाहिजे व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला पाहिजे.याप्रसंगी बोलताना सहचिटणीस दिगंबर गिते म्हणाले की, शिक्षणामुळे जीवनात व्यक्तीची नवीन ओळख निर्माण होते.अशक्य गोष्टी शक्य करता येतात.संचालक टी.एम.डोंगरे यांनी कार्यशाळा घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षणाधिकारी ई. के.भाबड यांनी केले.कार्यशाळेसाठी इंग्रजी व गणित विज्ञान असे दोन उद्बोधन वर्ग ठेवण्यात आले.संस्थेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यातील कलागुणांना, सृजनशीलतेला वाव मिळावा तसेच विद्यार्थ्यांच्या मनात या विषयांबद्दल असलेली भीती घालवण्यासाठी असे उपक्रम महत्त्वपूर्ण असतात असा सुरू या उपक्रमातून निघाला.व्ही.एन नाईक शिक्षण संस्थेतील शिक्षकांनी या कार्यशाळेमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एक लाख वृक्षारोपणाचा संकल्प : भोर

**देवळाली कॅम्प ।** भारतीय जनता पार्टी पर्यावरण विकास आघाडीच्या वतीने ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नाशिक जिल्ह्यात एक लाख भव्य वृक्षारोपण व वृक्ष लागवडीचा संकल्प सोहळा केला आहे.

नाशिक जिल्ह्यातील दक्षिण विभागातील भाजपाचे १८ मंडल आहे.१८ मंडल अध्यक्षांशी तसेच पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संपर्क साधून त्या ठिकाणी एक लाख झाडे वृक्षरोपण करण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी देवळाली -भगूर मंडल पासून या वृक्षारोपण लागवडीची सुरुवात होणार आहे.

मोदी सरकारला अकरा वर्ष पूर्ण झाले म्हणून पहिल्या टप्प्यात भाजपाचे नाशिक जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक पर्यावरण विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष तानाजी भोर देवळाली- भगूर मंडलामध्ये देवळाली कॅम्प येथील श्री गजानन महाराज मंदिर विजयनगर या ठिकाणी गुरुवार दि. ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सकाळी १० ते १२ दरम्यान प्रथम ११००० हजार झाडांचे वृक्षारोपण लागवडीचे संकल्प देवळाली कॅम्प,भगूर परिसरात विविध मान्यवरांच्या व भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाचे नाशिक जिल्हा सरचिटणीस शरद कासार व संयोजक पर्यावरण विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष तानाजी भोर यांचे कार्यालय विजयनगर येथील साई समर्थ याठिकाणी दिली.

या बैठक प्रसंगी देवळाली- भगूर मंडल अध्यक्ष प्रसाद आडके, तालुका उपाध्यक्ष हिरामण आडके, ज्येष्ठ कार्यकर्ते मधुकर कापसे, प्रताप गायकवाड, दिनेश गोविल, प्रकाश कर्डिले, संदीप शेटे, निलेश हासे, मयूर शेटे, प्रशांत वराडे, दिलीप मोरे आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### पर्यवेक्षक नंदकुमार न्याहारकर सेवानिवृत्त

**पिंपळगाव बसवंत ।** येथील 'मविप्र' संस्थेच्या माधवराव बोरस्ते विद्यालयाचे उपशिक्षक व जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सातपूरचे पर्यवेक्षक नंदकुमार न्याहारकर यांचा ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्ती सोहळा बोरस्ते विद्यालय ओझर व जनता विद्यालय सातपूर येथे



त्यांना सेवापूर्ती निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सोपान वाटपाडे, प्राचार्य प्रमोद कांगुणे होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक धैर्यशील पाटील उपमुख्याध्यापिका कविता शिंदे पर्यवेक्षक दशरथ शिंदे संजय ठाकरे मीना पोटींदे उपस्थित होत्या. प्रास्ताविकात शिक्षक नरेंद्र डेरले व प्रशांत महाबळ यांनी पर्यवेक्षक नंदकुमार न्याहारकर यांच्या सेवा संदर्भात माहिती देताना, संस्थेच्या रामेश्वर नैताळे बाणगाव देशमाने जळगाव (गा) पिंपळद सिन्नर पाटोदा उसवाड देवरगाव काजीसांगवी मांडवड ओझर सातपूर या विद्यालयात सेवा करण्याची संधी मिळाली. सन २००७ पासून जिल्ह्यातील विविध शाळा महाविद्यालयांचे उपक्रम प्रकल्प शिबिरे चर्चासत्रे कृती कार्यक्रम सोहळयांना प्रसिद्धी देण्यासाठी दैनंदिन अतिरिक्त वेळ देऊन राज्यातील नामांकित वृत्तपत्रात प्रसिद्धी व जाहिरातीचे प्रचंड काम केले. समाज दिनानिमित्त त्यांना प्राचार्य सोपान वाटपाडे यांच्या हस्ते सर्वात प्रथम 'मविप्र' संस्थेचा मानाचा 'समाजभूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सोपान वाटपाडे, प्रमोद कांगुणे यांच्या हस्ते सत्कारमूर्ती पर्यवेक्षक नंदकुमार न्याहारकर यांना शाल श्रीफळ सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# सौंदाणे येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

## ३८ वर्षांनी एकत्र येत आठवणींना उजाळा देत एकमेकांविषयी ऋणानुबंध केले घट्ट

**सौंदाणे ।** येथील जनता विद्यालय, सौंदाणे या माध्यमिक शाळेतील सन १९८६/८७ मध्ये इयत्ता दहावीला शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा कर्मवीर भाऊसाहेब हिरे शैक्षणिक संस्थेच्या सौंदाणे येथील जनता विद्यालयाच्या इमारतीच्या आवारात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक ए.व्ही.देवरे होते. तर कार्यक्रमास तत्कालीन शिक्षक वृंद अनुक्रमे श्रीराम पवार, एस.आर.ठोके, एस.जी. शेवाळे, एकनाथ देसले, विद्यमान मुख्याध्यापक चव्हाण, शिपाई पवार व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी संपन्न झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. सरस्वती पूजनानंतर सर्वप्रथम स्वर्गीय माजी विद्यार्थी निवृत्ती रतन पवार माजी सैनिक वाके यांच्यासह इतरही स्वर्गीय माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येऊन त्यांच्या कार्यकर्तृत्वाचाही परिचय प्रस्तावनेतून करून देण्यात आला. यावेळी मेळाव्यास तत्कालीन सर्व शिक्षक वृंद व अ ब क या दहावीतील सर्व माजी विद्यार्थी हजर होते. यावेळी सर्व माजी विद्यार्थी यांनी शिक्षक वृंद यांच्या प्रति नतमस्तक होत त्यांना मानवंदना देत कृतज्ञता व्यक्त करून आशीर्वाद घेतले .यावेळी कार्यक्रमास



उपस्थित शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांच्या कार्य कौतुकाचे कौतुक केले तर माजी विद्यार्थी यांनी शिक्षकांनीच आम्हाला चांगले घडवले चांगले संस्कार केले म्हणून आज आम्ही समाजामध्ये चांगले नागरिक म्हणून सुजान नागरिक म्हणून जीवन जगत असून याचे सर्व श्रेय आमच्या आई-वडिलांनंतर तुम्हा शिक्षकांचेच आहेत अशी कृतज्ञता आपल्या भाषणांमधून व्यक्त केली. सर्व शिक्षकांनी व माजी विद्यार्थ्यांनी आपला ओळख परिचय करून देऊन शाळेसंबंधीत सर्व आठवणींना उजाळा देत जीवन जगत असताना सुख दु:खाच्या मनमोकळ्या गप्पा आपल्या भाषणामधून मारल्या.एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेत सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे मनोरंजन करत दैनंदिन ताण-तणावांमधून मुक्त होत सखा भेटीचा आनंद लुटला. अ ब क तिन्ही तुकड्यांमधील माजी विद्यार्थ्यांनी वर्ग भरवून तत्कालीन वर्ग शिक्षक वृंदांनी सदरहू वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचा तास घेतला यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी गत गतकाळातील इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये शिक्षण घेत असल्याचाच भास होत होता हेच यश व आनंद या माजी विद्यार्थी मेळाव्याने विद्यार्थ्यांनी मिळवले. गतकाळातील आपल्या वर्गातील आठवणींना उजाळा देऊन कृतकृत्य झाल्याची भावना सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटली होती.

एस जी शेवाळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामधून स्वतःचा सुखी संसार करत असतानाच समाजाप्रती असलेले ऋणही आपण वेळोवेळी सामाजिक उपक्रम राबवून फेडत असल्याचे बघून आम्हा शिक्षकांना धन्य झाल्याची भावना .वेळोवेळी मनात दाटून येते असे म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वच माजी विद्यार्थी गेल्या पंधरा दिवसापासून झटत होते. यावेळी कार्यक्रमास जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सदर मेळाव्यामध्ये माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा गौरव करून शाळेस भेटवस्तू देण्यात आल्यात.

तसेच वृक्षारोपणासाठी वृक्ष भेट देत पर्यावरण संरक्षणासाठीचा संदेशही समाजाला या मेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी दिला. तसेच कार्यक्रमास उपस्थित माजी सैनिकाचा व व तत्कालीन इयत्ता दहावीमध्ये प्रथम आलेल्या माजी विद्यार्थ्यांचा ही सर्वांच्या वतीने शाब्बास गुरूजी पुस्तक भेट देऊन गौरव करण्यात आला .पुढील वर्षाच्याचाही माजी विद्यार्थी मिळाव्याचे नियोजन करून कार्यक्रम स्थळावरून भावना विवश होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### जुन्या आठवणींमुळे माजी विद्यार्थी भारावले

यात्रसंगी आपल्या शाळेतील जुन्या आठवणींच्या अनुभवांना माजी विद्यार्थी अनुक्रमे भरत पवार, पंकज कोचर, अरुण पवार, जगदिश निकम, दत्तू कारवाळ भास्कर पवार, किशोर पवार, भाऊसाहेब पवार, मनिषा जाधव, शोभा देवरे, जितेंद्र पगार, प्रमोद बच्छाव, रमेश सोनवणे, दिपक बिल्लाडे, हरेश्वर बागूल, सुनिता पगारे, पुष्पा पवार ललिता देवरे, संतोष पवार, विजय पिंगळे, शैलेश आहेर, सतीष खैरनार, सुनिल पवार, राजेंद्र पवार, श्याम पवार, सुरेश पवार, किरण अहिरराव, नानासाहेब पवार, सुनिता आहेर, मंगला सुर्यवंशी, उषा शिंदे, छाया थोरात, मनिषा पवार, रघुनाथ पवार, नानासाहेब पवार, सुनिता पवार, विमल देवरे, मंगल सावंत, देविदास पगार, संगीता पवार, अनिता पवार, उषा पवार आदींनी उजाळा दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गेल्या एक महिनाभरापासून पंकज कोचर, जगदीश निकम, भास्कर पवार, अरुण पवार, दत्तू कारवाळ, शोभा पवार, किशोर पवार, प्रमोद बच्छाव, सुनिता पगारे, तिलोत्तमा पवार, जयश्री गायकवाड, कमल देवरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण पवारयांनी केले.







# अपूर्ण कामाचे लाटले तब्बल ४ कोटी ७४ लाख

## जिल्हा शासकीय रुग्णालयातील धक्कादायक प्रकार । सिव्हिल सर्जन शिंदे यांची भूमिका संशयास्पद

**नाशिक ।** संपूर्ण राज्यात सध्या 'लाडक्या' ठेकेदारांचा बोलबाला असून जिल्हा रुग्णालयात देखील एका 'लाडक्या' ठेकेदाराने शासनाच्या डोळ्यात अक्षरशः धुळफेक चालवली आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे सिव्हिल हॉस्पिटल मध्ये सुरू असलेले शस्त्रक्रियागृहाच्या आधुनिकीकरणाचे आणि आधुनिक प्रसूतीगृहाचे काम वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. सदरचे काम मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असताना ठेकेदाराशी संगणमत करत तब्बल ४ कोटी ४७ लाख ३० हजार रुपयांचे देयक लाटल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे.

जानेवारी महिन्यात सुरू झालेले काम ४५ दिवसात पूर्ण करण्याची मुख्य अट असताना सिव्हिल सर्जन यांचा वरदहस्त लाभल्याने तब्बल ५ महिने उलटूनही काम पूर्ण न केल्याने ठेकेदाराच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केले जात आहे. दरम्यान काम झालेले नसतानाही इतक्या मोठ्या रकमेचे देयक लाटल्याने सिव्हिल सर्जन यांच्या भूमिकेवर देखील व्यक्त केला जात असून यामागे काही आर्थिक तडजोडी आहेत का? असाही संशय व्यक्त केला जात आहे.

नाशिक जिल्हा नियोजन समितीकडून २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता जिल्ह्यातील रुग्णालयाचे बांधकाम विस्तारीकरण,देखभाल




दुरुस्ती, फायर ब्रिगेड यंत्रणा खरेदी करणे देखभाल,दुरुस्ती, रुग्णालयांच्या इमारतींचे लेखा परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) मोठी बांधकामे या योजनेअंतर्गत सिव्हिल सर्जन यांनी नियोजन समितीला दिलेल्या पत्रानुसार जिल्हा रुग्णालयात नव्याने स्थापित करण्यात आलेल्या एमसीएच विंग येथे शस्त्रक्रिया गृहाचे आधुनिकीकरण (मॉड्युलर ऑपरेशन थिएटर)तसेच आधुनिक प्रसूतीगृहाचे (मॉड्युलर लेबर रूम) यांचे टर्न की तत्त्वावर काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात







आली होती. दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी देण्यात आलेल्या मान्यतेनुसार जिल्हा शासकीय रुग्णालयामार्फत या कामाची ई-निविदा प्रणाली राबविण्यात आली. त्यानुसार सिव्हिल सर्जन यांच्या खास मर्जीतील गेटवेल डिस्ट्रीब्यूटर यांची निविदा मंजूर करून कार्यादेश निर्गमित करण्यात आले. सदरची निविदा प्रक्रिया अनेक कारणांनी वादग्रस्त ठरली. याबाबत तक्रारी देखील करण्यात आल्या असे असताना सिव्हिल सर्जन यांचा वरदहस्त लाभल्याने ठेकेदाराची मनमानी आजही सुरू असल्याचे दिसून येत आहे.या कामात मोठ्या प्रमाणावर शासकीय नियमांना बगल देण्यात

> या गंभीर प्रकरणी प्रस्तुत प्रतिनिधीने जिल्हा शासकीय रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांची कुठलीही प्रतिक्रिया मिळाली नाही. किंबहुना व्हाट्सपच्या माध्यमातून त्यांना संदेश देऊन प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी अप्रत्यक्षरीत्या प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली.

आली असून कामाच्या गुणवत्तेबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. असे असताना या कामावर कोणाचाही अंकुश नसल्याने ५ महिने उलटूनही काम पूर्ण झालेले दिसून येत नाही. सदरचे काम ४५ दिवसात पूर्ण करावे असे निविदेतील महत्त्वाची अट असताना ठेकेदाराने सिव्हिल सर्जन यांच्याशी असलेल्या सलोख्याचा फायदा घेत अतिशय संथ गतीने काम सुरू ठेवल्याचा आरोप यातील काही तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे सदरचे काम मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असताना शासनाच्या डोळ्यात धुळफेक करत तब्बल ४ कोटी ७४ लाख ३० हजार रुपयांचे देयक मंजूर करून शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकला आहे. सदरील देयक मार्च महिन्यात काढून घेतल्याची माहिती समोर येत असून त्यानंतरही तब्बल दोन महिने उलटून काम पूर्ण न करता इतके मोठे देयक मंजूर करण्यामागे काही 'अर्थकारण' आहे का? असाही संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरण गंभीर असल्याने शासनाने दखल घेऊन सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात असून संबंधित ठेकेदाराविरुद्ध कारवाई करण्यात येऊन ज्या अधिकाऱ्यांनी संबंधित देयक मंजूर केले आहे त्यांचीही चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

**जिल्हा शासकीय रुग्णालया-संदर्भात कुठलीही तक्रार असल्यास दै. महासागर, 0253- 4513384 यावर संपर्क साधावा**

---

### ➤ महत्त्वाचे

## जगण्याचे सामाजिक भान म्हणजे 'कोळवाडा' : डॉ. गवारी

**नाशिक ।** ग्रामीण भागातील परिस्थितीत आजही फारसा फरक झालेला दिसत नाही. शहरी आणि ग्रामीण




भाग यांच्यातील दरी बऱ्याच प्रमाणात आहे. अशा परिस्थितीत रात्रंदिवस काबाडकष्ट करून आपलं जीवन जगणाऱ्या महादेव कोळी समाजाच्या वाट्याला आलेलं दु:ख आणि त्यातून निर्माण झालेलं जगण्याचं सामाजिक भान मांडणारं पुस्तक म्हणजे 'कोळवाडा' आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक डॉ.गोपाळ गवारी यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमाचे १५० वे पुष्प 'कोळवाडा' या पुस्तकावर गुंफताना ते बोलत होते. डॉ.तेजस्विनी कदम अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. गवारी पुढे म्हणाले की, आदिवासी भागातील महादेव कोळी समाजाच्या वाट्याला आलेल्या अपरिमित वेदना, कष्टप्रद जीवन, सोसलेल्या यातना यांचे वास्तव चित्रण मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या पुस्तकात केला आहे. महादेव कोळी समाजातील विविध व्यक्तिचित्रे उभी करून वास्तव परिस्थितीचा मागोवा घेतला आहे. जीवन जगत असताना संघर्ष-यातना भोगल्याशिवाय आणि सोसल्याशिवाय गत्यंतर नव्हते. अतिशय कठीण परिस्थितीवर मात करून कोळवाड्यातील माणसं स्वतःच्या कर्तृत्वावर मोठी झाली आहेत, असेही ते म्हणाले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते करुणासागर पगारे आणि दिनकर पगार यांना ग्रंथभेट देण्यात आली. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले.

---

# नाशिक जिल्ह्यातील मंदिर चोऱ्यांतील मोठी कारवाई

## सराईत गुन्हेगार गजाआड, ७ गुन्ह्यांचा पर्दाफाश

**नाशिक ।** नाशिक जिल्ह्यातील विविध भागांतील पुरातन मंदिरांमध्ये चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. या कारवाईत ३ सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून ७ मंदिर चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यांच्या ताब्यातून सुमारे १.९३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी उघडकीस न आलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन संबंधित गुन्हेगारांविषयी माहिती मिळवण्याच्या सूचना पोलिस पथकांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र मगर यांच्या पथकाने तपास सुरू केला असता गतवर्षी व चालू वर्षात सिन्नर, लासलगाव, निफाड, वाडीव-हे पोलीस ठाणे हद्दीत मंदिर चोरीचे गुन्हे घडले होते. आरोपी मंदिरांमधून चांदी व पितळ धातूंच्या वस्तू चोरी करून, सीसीटीव्ही डिव्हीआर मशीन सुद्धा चोरून नेत होते. त्यांनी गावांतील पुरातन मंदिरांवर लक्ष्य केंद्रित केले होते व कोणताही पुरावा मागे न ठेवता चोरी करत होते.तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांना या गुन्ह्यांमध्ये संगमनेर तालुक्यातील काही सराईत गुन्हेगारांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार, पथकाने चाकण (जि. पुणे) व टिटवाळा (जि. ठाणे) येथून सुयोग अशोक दवंगे, संदीप उर्फ शेंडी निवृत्ती गोडे,अनिकेत अनिल कदम यांना अटक केली आहे.त्याचप्रमाणे संदीप किसन साबळे, दिपक विलास पाटेकर हे आरोपी



फरार आहे. चौकशीत आरोपींनी नाशिक जिल्ह्यातील मंदिर चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्या ताब्यातून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. टोळी प्रमुख सुयोग दवंगे हा मॅकेनिकल इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असून, गुगल मॅपवर गावांतील मंदिरांची माहिती शोधून चोरी करत होता. तसेच यूट्यूबवरील कुलूप तोडण्याच्या व्हिडीओंमधून शिकून, हायड्रॉलिक कटरच्या सहाय्याने कुलूप तोडत असल्याची माहितीही तपासात उघड झाली आहे. या आरोपींवर यापूर्वीही मालमत्तेविरुद्ध गुन्हे दाखल आहेत. पोलिसांना त्यांच्याकडून आणखी मंदिर चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. ही कारवाई नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील व अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रविंद्र मगर, सपोउनि नवनाथ सानप, व पोलीस अंमलदार विनोद टिळे, नवनाथ शिरोळे, हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम व संदीप नागपुरे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

---

## गायक नंदकुमार देशपांडे यांना संगीत जीवनगौरव पुरस्कार जाहीर



**नाशिक ।** जिल्हा कोचिंग क्लासेस संचालक संघटना व संदीप युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिभा सन्मान २०२५ सोहळा रविवारी ८ जून रोजी होणार आहे. त्यामध्ये येथील सरगम म्युझिक अकॅडमीचे संचालक नंदकुमार देशपांडे यांना संगीत जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कॉलेजरोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त चंद्रकांत खांडवी, संदीप युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉ. संदीप झा, कोचिंग क्लासेस संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते नंदकुमार देशपांडे यांना सन्मानित करण्यात येईल. गेली ३० वर्षे सरगम म्युझिक अकॅडमीच्या माध्यमातून त्यांनी असंख्य कलाकारांना घडविले आहे. त्यांचे विद्यार्थी नामवंत गायक कलाकार म्हणून नावारूपाला आले आहेत. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल देशपांडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---

## महाराष्ट्र एनजीओ समितीतर्फे सेवाभावी संस्थांसाठी मोफत कार्यशाळा

**नाशिक ।** सेवाभावी संस्थांची बांधणी व्हावी तसेच संस्थांना चालना मिळावी या दृष्टिकोनातून एकदिवशीय कार्यशाळा महाराष्ट्र एनजीओ समिती मार्फत आयोजित केली आहे.

नाशिक कृषीनगर येथील हॉटेल करी लिव्हज येथे दि.६ शुक्रवार रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत दरम्यान ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून यावेळी महाएनजीओचे अध्यक्ष डॉ.युवराज येडुरे हे मार्गदर्शन करणार आहेत यात संस्था स्थापन करणे, संस्थांची कार्यपद्धती,सीएसआर फंड मिळवण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता, सीएसआर फंड कसा मिळवावा,यासह अनेक महत्त्वाच्या विषयांवर या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती महाएनजीओचे चिटणीस लक्ष्मण डोळस यांनी दिले आहे.

नाशिककरांनी या मोफत कार्यशाळा नाव नोंदणीसाठी मो. 9420303354 या मोबाइल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन महा एनजीओ चे उपाध्यक्ष डॉ सुनीता मोडक शीतल उगले यांनी केले आहे.

---

# सप्तश्रृंगी गड रोपवे प्रकल्पाचा करारच गायब!

## १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश

**नाशिक ।** कळवण येथील प्रशासकीय कार्यालयात काल सप्तश्रृंगी गड रोपवे प्रकल्पासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी अनुकरी नरेश होते. सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत रोपवे प्रकल्पाशी संबंधित करारनामा, आरोग्य व स्वच्छता सुविधा, भाविकांसाठी आवश्यक सोयीसुविधा, विमा आणि उत्पन्नाबाबतची पारदर्शकता अशा अनेक मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. प्रांताधिकारी अनुकरी नरेश यांनी रोपवे कंपनीकडून अद्यापही करारनामा सादर न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच पुढील १५ दिवसांत प्रकल्पासंबंधी सविस्तर अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश दिले.

देवी संस्थान व ग्रामपंचायतीकडे रोपवे कंपनीने करारनामा आजतागायत सादर केलेला नाही. याबाबत प्रांताधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. रोपवे कंपनीने भाविकांचा विमा उतरवलेला असला, तरी ती अद्याप जाहीर केलेला नाही तो दोन दिवसांत जाहीर करण्याचे आदेश देण्यात आले. रोपवे कंपनीच्या उत्पन्नाची स्पष्ट माहिती उपलब्ध नसून ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिली जाते, असे कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले. भाविकांसाठी आरोग्य सुविधा वाढवण्याबाबत पुढील पंधरा दिवसांत निर्णय घेण्यात येणार असल्याचे कंपनीने सांगितले. दर्शनासाठी नियमावली तयार होणार असून देवीच्या गाभाऱ्यात रोपवेने येणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र नियमावली तयार केली जाणार असून, हा अधिकार देवी संस्थानकडे असणार आहे. पाय-यांनी येणाऱ्या भाविकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. देवी संस्थानने स्पष्ट केले की पायऱ्यांनी गड चढून येणाऱ्या भाविकांना प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. भाविकांची श्रद्धा आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, असे देवी संस्थानने स्पष्ट केले. पायऱ्यांनी येणाऱ्या भाविकांकडून नारळ वाहणे बंद असून, रोपवेने येणाऱ्यांकडूनही नारळ वाहण्यावर बंदी घालण्याची शिफारस करण्यात




आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिकाही संशयास्पद दिसली. रोपवे कंपनीच्या अनियमित कामकाजाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यावर प्रांताधिकाऱ्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत ताशेरे ओढले. रोपवे कंपनीने १५ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करावा, असे आदेश प्रांताधिकाऱ्यांनी दिले आहेत. या बैठकीस

> **महत्वाच्या घडामोडी**
>
> सप्तश्रृंगी गड रोपवे प्रकल्पाचा अहवाल १५ दिवसांत सादर करा, असे आदेश उपविभागीय अधिकारी अनुकरी नरेश यांनी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका संशयास्पद दिसल्याने प्रांताधिकारी संतापले होते. पायऱ्याने येणाऱ्यांना प्राधान्य देण्याचे व रोपवेवाल्यांना नियम आखणे यावर देवी संस्थानचा ठाम पवित्रा दिसला. भाविकांचे जीवन धोक्यात असल्याने रोपवे प्रकल्पावरून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसले.

कळवणचे तहसीलदार रोहिदास वारुळे, देवी संस्थानचे विश्वस्त ॲड. ललित निकम, संस्थानचे व्यवस्थापक सुदर्शन दहातोंडे, कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहायक अभियंता रोहिणी वसावे, रोपवे कंपनीचे सहाय्यक व्यवस्थापक अनिल सोनवणे, प्रतिनिधी सोपान कानमंडळे व विशाल पानमळे, सरपंच रमेश पवार, ग्रामसेवक देवरे, विजय वाघ आदी अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

सप्तश्रृंगीगड येथील रोपवे प्रकल्पावर सध्या अनेक प्रश्नचिन्हें उपस्थित झाली असून, प्रशासनाने याबाबत सक्रिय भूमिका घेतली आहे. १५ दिवसात अहवाल सादर केला जातो का? त्यातील माहिती पारदर्शक असते का? याकडे सर्व भाविकांचे लक्ष लागून राहिले आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी या सर्व प्रकल्पमध्ये जातीने लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी, अशी भाविकांची मागणी आहे.

# मार्शल संघटित-असंघटित कामगार युनियनचा 'चड्डी मोर्चा' भर

## पावसात दुसऱ्या दिवशी कसारा येथे मुक्कामी




**सिडको ।** अंबड औद्योगिक वसाहतीतील ट्रॅक कॉम्पोनंट्स या कंपनीकडून स्थानिक कामगारांवर होत असलेल्या अन्यायकारक आणि मनमानी कारभाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रणित मार्शल संघटित-असंघटित कामगार युनियनने 'चड्डी मोर्चा' सुरू केला आहे.

या आंदोलनाची सुरुवात सोमवारी कामगार उपायुक्त कार्यालय येथून झाली असून, मोर्चा थेट मंत्रालय, मुंबईकडे कूच करत आहे.

दुसऱ्या दिवशी मंगळवारी मोर्चा कसारा येथे मुक्कामी थांबला असून, जोरदार पावसाचा सामना करीत मोर्चेकरी बुधवारी पुढील प्रवास करेल. नंतर भिवंडी येथे मुक्काम असेल आणि त्यानंतर मंत्रालयावर धडक दिली जाणार आहे. या आंदोलनाचं नेतृत्व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत खरात करत असून, शहरातील विविध कामगार संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. विशेष बाब म्हणजे इतक्या तीव्र आणि जनआंदोलनाच्या स्वरूपातील या मोर्चाची दखल अद्याप ना कंपनी प्रशासनाने घेतली, ना जिल्हा प्रशासनाने. यामुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाचं वातावरण आहे.

मुंबई महामार्गावरून दररोज मंत्र्यांच्या व प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या गाड्या जात असतानाही या मोर्चाकडे अद्याप कोणीही लक्ष दिलं नाही. ही बाब विशेष चिंतेची असून, सरकारकडून होणारी ही दुर्लक्ष भूमिका संतापजनक मानली जात आहे.

### कामगारांच्या प्रमुख मागण्या

कंत्राटी कामगारांना कायदेशीर सुरक्षा मिळावी. स्थानिक कामगारांवर अन्याय करणाऱ्या ट्रॅक कंपनीचे बेकायदेशीर कंत्राट रद्द करावे. कंपनीच्या ४०% अतिक्रमणावर तात्काळ कारवाई करावी. अनधिकृत पार्किंग व वृक्षतोडीविरुद्ध तात्काळ कारवाई करावी. युनियन सदस्यांना पूर्वसूचना न देता कामावरून कमी करणे थांबवावे व सर्व कामगारांना कायम करावे. अपघातांची चौकशी करून जबाबदारांवर गुन्हे दाखल करावेत. कंपनीतील बेकायदेशीर कामकाज तत्काळ थांबवावे.

# क्लासेसच्या पाट्या, जाहिराती मराठीत करण्याची मागणी

## अन्यथा मनसेचा खळखट्याकचा इशारा




**नाशिक ।** नाशिक शहरातील क्लासेस चालकांनी त्यांचे नामफलक आणि त्यांच्याकडून करण्यात येणाऱ्या क्लासेसच्या जाहिराती मराठीतून करण्यात याव्या, वसे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि मनसे विद्यार्थी सेनेच्यावतीने करण्यात आले आहे. मराठीकरणाची अंमलबजावणी न झाल्यास मनसे स्टाईलने खळखट्याक इशाराही देण्यात आला आहे.

एका नामांकित क्लासमध्ये एका विद्यार्थ्याला फी न भरल्यामुळे क्लासमध्ये बसून दिले नव्हते. त्याचे आय कार्ड क्लासने जमा केले. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राजगड येथे येऊन आपले कैफियत मांडली त्यानंतर मनसे विद्यार्थी सेनेच्यावतीने त्यांना जाब विचारण्यासाठी क्लासमध्ये गेले होते. यावेळी नाशिक शहरातील अनेक नामवंत क्लासेस आहे ते भरमसाठ फी घेऊन आपल्या क्लासची जाहिरात करत असतात, परंतु मनसेच्या असं निदर्शनास आले आहे की या सर्व क्लासेसच्या पाट्या आणि जाहिराती या इंग्रजीमध्ये असून महाराष्ट्रात राहून मराठीची अवहेलना होत आहे. आत्ताच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारने दखल घेऊन मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी भाषा अनिवार्य आहे, ज्याप्रमाणे भारतात दक्षिण राज्यांमध्ये त्यांच्या स्थानिक भाषेला प्राधान्य देण्यात येते, त्याचप्रमाणे महाराष्ट्रात पण मराठीचे अवहेलना नको, यासाठी मनसे अग्रेसर असून लवकरात लवकर सर्व क्लासेस चालकांनी याची दखल घेऊन आपल्या सगळ्या इंग्रजी पाट्या आणि जाहिराती मराठीमध्ये कराव्या अन्यथा मनसेतर्फे खळखट्याक करण्यात येईल. प्रत्येक क्लासेस मध्ये मराठी भाषिक शिक्षक पाहिजे.

आणि सर्व क्लासेस यांनी आपले क्लासचा परिसराला पार्किंग आहे की नाही, क्लासमध्ये बसण्याची व्यवस्था योग्य आहे की नाही. क्लासमध्ये शुद्ध पाण्याची सोय आहे का, क्लासमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेली आहे का, क्लासेस मध्ये फायर सेफ्टी साठी तरतूद केली आहे का. क्लासेसचे ठिकाण मध्यवर्ती आहे का,

हे सर्व क्लास चालकांनी तपासावे आणि तसे नसेल तर लवकरात लवकर त्यात सुधारणा करावी अन्यथा मनसे आंदोलन करेल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष ललित वाघ, जिल्हाध्यक्ष कौशल पाटील, मनसे शहर संघटक रोहित उगावकर, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शाखाध्यक्ष वर्धमान संचेती,मनविसे विभाग अध्यक्ष अक्षय गवळी, मयूर जैन, मोहित पाटील, मयूर पाटील, तेजस पाटील, शुभम रोकडे, प्रतीक तुपसमुद्रे आदी उपस्थित होते.

# प्रामाणिकपणे काम करणारे कर्मचारी संस्थेचा आधारस्तंभ : विश्वासराव मोरे



**पिंपळगाव बसवंत ।** सेवापूर्ती ही केवळ एका अध्यायाची समाप्ती नसून, जीवनातील एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. आज आपण ज्या सहकाऱ्यांचा गौरव करतो आहोत, त्यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणे, निःस्वार्थपणे आणि अत्यंत जबाबदारीने आपले कर्तव्य बजावले. त्यांच्या कार्याने संस्थेला बळकटी मिळाली आणि अनेकांना प्रेरणा मिळाली. त्यांच्या अनुभवाचा लाभ पुढेही समाजाला आणि नव्या पिढीला होत राहील. जे सेवक प्रामाणिकपणे काम करतात त्यांच्या पाठीशी संस्था उभी राहते, असे कर्मचारी संस्थेत आहेत हेच संस्थेचे आधारस्तंभ आहेत असे प्रतिपादन मविप्रचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान व वाणिज्य पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात कार्यालयीन अधीक्षक आनंदा पवार, वरिष्ठ लिपिक नारायण कडलग, कनिष्ठ लिपिक दीपक डेर्ले यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र मोरे, प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. साहेबराव मोरे आदी उपस्थित होते. यावेळी रवींद्र मोरे म्हणाले की, आजचा दिवस हा केवळ सेवापूर्तीचा नाही, तर एका यशस्वी कारकिर्दीचा गौरव करण्याचा आहे. ज्यांची आपण आज प्रशंसा करत आहोत, त्यांनी आपल्या कार्यकाळात सचोटी, कर्तव्यनिष्ठा आणि संघभावना यांचे उत्तम उदाहरण समोर ठेवले. त्यांना उत्तम आरोग्य, आनंदी जीवन आणि यशस्वी पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक डॉ. सुरेश जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एस. के.मोरे यांनी केले. आभार प्रा. भगवान कडलग यांनी मानले. याप्रसंगी प्रा. पी.डी. डोखळे, ज्ञानेश्वर मवाळ, अरूण मोगरे या सेवकांनी मनोगते व्यक्त केली. तसेच सेवापूर्ती सत्कारमूर्तीमध्ये आनंदा पवार, दिलीप डेर्ले, सौ. सुनीता डेर्ले यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर सेवक, सत्कारमूर्ती यांचे नातेवाईक बहुसंख्य उपस्थित होते.

# पिंपळगाव बसवंतला माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला झेरॉक्स मशीन भेट



**पिंपळगाव बसवंत ।** येथील पिंपळगाव हायस्कूलचे 1983 या शैक्षणिक वर्षातील दहावीचे विद्यार्थी व शाळेचे माजी विद्यार्थी आणि यशस्वी उद्योजक शैलेश कावळे यांनी शाळेप्रती बांधिलकी जपताना शाळेला कॅनान कंपनीचे दर्जेदार झेरॉक्स मशीन सप्रेम भेट दिले आहे सोमवारी सकाळी हायस्कूलच्या सभागृहात आयोजित केलेल्या विशेष समारंभात माजी विद्यार्थी व संस्थेच्या संचालक मंडळाच्या उपस्थितीत झेरॉक्स मशीन शाळेला प्रदान करण्यात आले यावेळी निफाड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा मंगला जाधव उपाध्यक्ष भास्कर बनकर सचिव अविनाश देशमाने सहसचिव अरुण महाले संचालक सोमनाथ मोरे उद्धवराव निरगुडे बाळासाहेब बनकर रामराव मोरे अरविंद जाधव रमाकांत जाधव बी आर पाटील पंढरीनाथ संधान शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे शैलेश कावळे आदी मान्यवर उपस्थित होते दरम्यान पिंपळगाव हायस्कूलचे माजी विद्यार्थी देश पातळीवर विविध ठिकाणी उच्च पदावर काम करत आहे मात्र पिंपळगाव हायस्कूलच्या आठवणी त्यांनी सदैव जपल्या आहेत आपल्या शाळेला आपण काहीतरी देणे लागतो ही भावना विद्यार्थ्यांमध्ये असल्यामुळे प्रत्येक बॅचचे विद्यार्थी शाळेला वस्तूरूपाने रोख स्वरूपात मदत करत असतात त्याच भावनेतून 1983 मध्ये दहावीत असलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेला झेरॉक्स मशीन देण्याचे निश्चित केले त्यानुसार अर्धी रक्कम 1983 च्या विद्यार्थ्यांनी देऊ केली तर उर्वरित अर्धी रक्कम शैलेश कावळे यांनी अदा करून झेरॉक्स मशीन विशेष समारंभात शाळेकडे सुपूर्द करण्यात आले यावेळी पिंपळगाव हायस्कूलचे नूतन मुख्याध्यापक रामराव बनकर यांच्यासह नवनियुक्त उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला तर पिंपळगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक सुभाष जाधव यांची चिंचखेड हायस्कूलला बदली झाल्यामुळे त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला यावेळी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका फरजाना शेख ,शिक्षक, शिक्षिका, 1983 चे विद्यार्थी सुनीत मुथा मोहन घोडके राजेंद्र चांदवडकर आरिफ काझी उत्तम खैरनार सुभाष गोसावी संजय आकडे सुभाष बनकर किरण मोरे कांतीलाल पटेल बाळासाहेब पगार करोडीमल पारख मुकुंद जाधव विजय सायखेडकर अनिल बैरागी डॉ नितीन तांबे देविदास विधाते संजय चव्हाण किरण उगले विजय शेवाळे विजय शिंदे आदिंसह शिक्षक वृंद उपस्थित होते याप्रसंगी उपाध्यक्ष भास्करराव बनकर शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे रामराव बनकर शैलेश कावळे आदींनी मनोगत व्यक्त केले समीर जाधव यांनी सूत्रसंचालन केले व सर्वांचे आभार मानले.







> पिंपळगाव हायस्कूलच्या सर्वच माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळे प्रती प्रेम व आदर आहे शाळेला काही ना काही मदत केली पाहिजे अशी प्रत्येक विद्यार्थ्यांची भावना आहे या भावनेतूनच माजी विद्यार्थी शाळेला मदत करत असतात आज 1983 मधील दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला अतिशय उपयुक्त असे झेरॉक्स मशीन भेट दिले झेरॉक्स मशीन मिळाल्यामुळे शाळेच्या खर्चात मोठी बचत होणार आहे याशिवाय काम सोपे होईल आणि वेळही वाचणार आहे.
>
> **– मंगला जाधव, अध्यक्षा, निफाड तालूका एज्युकेशन सोसायटी**

> माझे बालपण तसेच पाचवी ते दहावी शिक्षण पिंपळगाव हायस्कूल मध्येच झाले आहे त्यामुळे शाळेबद्दल मला नितांत प्रेम आदर आहे शाळेला भरीव मदत करण्याची माझी खूप दिवसांची इच्छा होती मात्र तशी संधी व वेळ मिळत नव्हती आज झेरॉक्स मशीनच्या माध्यमातून योग आला माझ्या यशस्वी जीवन प्रवासात माझ्या शाळेचे व शिक्षकांचे बहुमोल योगदान असून यापुढेही मी शाळेसाठी निश्चित भरीव मदत करणार आहे.
>
> **– शैलेश कावळे, माजी विद्यार्थी व उद्योजक**

# सीमाताई, तुम्ही काहीच करू शकत नाही!

**उध्दव ठाकरेंचे शिलेदार व संजय राऊत यांचे उजवे हात मानले गेलेले सुधाकर बडगुजर यांची पक्षातून 'हकालपट्टी' झाल्यामुळे उध्दव ठाकरेंच्या शिवसेनेला नाशिकमध्ये मोठा धक्का बसला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पण ना ठाकरेंच्या शिवसेनेला धक्का बसला, ना सुधाकर बडगुजर यांना धक्का बसला. कारण ज्या काही घडामोडी गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या, त्यावरून हे सर्व होणारच होते. फरक फक्त एकच झाला की, आज बडगुजर यांच्या नावापुढे 'हकालपट्टी झालेला नेता' असा शब्दप्रयोग प्रसार माध्यमांमध्ये झाला असला, तरी लवकरच त्यांचा भारतीय जनता पक्षात शानदार प्रवेश सोहळा होईल. त्यावेळी नाशिकची सत्ता त्यांच्या हातात गेलेली दिसेल. कारण कोणत्याही अन्य पक्षातील नेत्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर त्याचा मागचा इतिहास विचारायचा नसतो, असा भाजपमध्ये सर्वसाधारण नियम झाल्यासारखाच आहे. राज्य मंत्रिमंडळाकडे नजर फिरविली तरी त्याचे उत्तर सहज मिळेल. नाशिक पश्चिमच्या आमदार सीमाताई हिरे यांना बडगुजर आपल्या पक्षात नको आहे. परंतु वरिष्ठांनी एकदा निर्णय घेतला तर आमदार मॅडम काय करू शकता? तीच अवस्था नाशिक मध्य मतदारसंघाची आहे. उद्या माजी आमदार व सध्या ठाकरेंच्या सेनेतील वसंतभाऊ गीते यांनी देखील भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतलाच, तर विद्यमान आमदार प्रा. देवयानी फरांदे काहीही करू शकणार नाही. कारण कोणत्याही प्रकारे का होईना सत्ता आपल्याच हातात पाहिजे, त्यासाठी आपला 'ओरिजनल' कार्यकर्ता मुळापासून नष्ट झाला तरी चालेल, अशी पॉलिसी सध्या तरी पक्षात दिसून येत आहे. त्यामुळेच ज्यांच्यावर करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले असले तरी त्यांच्या मांडीला मांडी लावून पक्षातील वरिष्ठ जाऊन बसत असतील तर खालचे कार्यकर्ते काय करू शकता? काही ठिकाणी तर बाहेरून आलेल्यांना तालुका व जिल्हा पातळीवर पक्षाची धुरा देखील सांभाळायला दिली आहे. त्यामुळे मूळच्या कार्यकर्त्याला आता सतरंज्या उचलल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला दिसत नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत सुधाकर बडगुजर नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे सुधाकर बडगुजर हे ठाकरेंच्या शिवसेनेला रामराम करणार असल्याच्या चर्चांना चांगलंच तोंड फुटलं होतं. पक्षसंघटनेत बदल करताना विचारात घेतले नसल्याची नाराजी सुधाकर बडगुजर यांनी बोलून दाखवली होती. पक्ष सोडायचा असल्याने काहीतरी कारण तर त्याला हवे ना! शिवसेनेने बडगुजर यांना काय नाही दिले त्यांना विधानसभेत पाठविण्याचा देखील प्रयोग करून पाहिला. परंतु त्यात त्यांना अपयश आले. पण आता ठाकरेंच्या शिवसेनेकडून बडगुजर यांची तडकाफडकी हकालपट्टी करण्यात आली असली, तरी ठाकरेंच्या शिवसेनेचे जे काही नुकसान व्हायचे होते ते झालेच व येत्या आठ दिवसात अधिक नुकसान होणार आहे ही देखील वस्तुस्थिती आहे...**






ठाकरेंच्या शिवसेनेची पत्रकार परिषद सुरु असताना राज्यपातळीवर अनेक मोठ्या घडामोडी सुरू होत्या. जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांच्या पत्रकार परिषदेला महानगरप्रमुख विलास शिंदे उपस्थित होते. याच महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्यासह दहा ते बाराजण नाराज असल्याचा गौप्यस्फोट बडगुजर यांनीच केला होता. बडगुजर यांना त्यांच्या मागे लागलेले शुक्लकास्ट संपविण्यासाठी पक्षप्रवेश करायचा आहे हे जग जाहीर आहे. सीमाताई हिरे यांचा संताप साहजिकच आहे. परंतु त्या काहीच करू शकणार नाही हे त्यांच्या लक्षात आलेले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यप्रदेश मधील सभेत विद्यमान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी ७० हजार कोटीचा घोटाळा केला व त्यांची जागा तुरुंगात असल्याचे जाहीर सभेत सांगितले होते. त्यानंतर तीनच दिवसांनी ते राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. त्यामुळे बडगुजर, विलास शिंदे किंवा अन्य कुणी या बाबी राज्य नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून अतिशय किरकोळ समजाव्या लागतील. सध्या गिरीश महाजन यांनी नाशिकच्या राजकारणात पूर्णपणे शिरकाव केला असून पक्ष संघटना जवळपास त्यांनी ताब्यात घेतल्यातच जमा आहे. तिथे कोणीही अध्यक्ष होवो अथवा कीतीही उच्च पदावर जावो, पण शेवटची सूत्रे मात्र गिरीश महाजन यांच्याच ताब्यात आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी म्हणजेच विधानसभा निवडणुकीत भाजपने ज्यांची पक्षातून हकालपट्टी केली, त्यांचाही प्रवेश लवकरच भाजपमध्ये होणार आहे हे सर्वांनाच कळते. बडगुजर भाजपमध्ये गेल्यानंतर निदान भाजपला दोन का होईना नगरसेवक मिळतील ही वस्तुस्थिती आहे. सुधाकर बडगुजर यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यामुळे ते भाजपात जाणारच होते. ठाकरेंच्या शिवसेनेने फक्त त्यांना सुखा सुखी जाऊ द्यायचे नाही म्हणून 'हकलपट्टी' हा शिक्का त्यांच्या माथी मारला. सध्या विरोधात राहण्यासाठी कोणाचाही मूड नाही. आयुष्यभर विरोधात राहून मिळणार काय ? त्यामुळे अनेक व्यावसायिक राजकारण्यांनी देखील सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला राहण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. नरेंद्र दराडे यांना सलग दोनदा आमदारकी देऊनही त्यांनी ठाकरेंना रामराम केलाच ना! दराडेंचे बंधू देखील आमदारच आहे. गिरीश महाजन यांनी नुकतेच जाहीर केले की, येथे आठ दिवसात अनेक पक्षांतरे होणार आहेत. त्यांच्या या वाक्यात दम आहे. खरोखरच अनेक जण पक्ष सोडणार आहे ही वस्तुस्थिती आहे. मग मूळ भाजपच्या कार्यकर्त्यांनी करायचे काय, याची फिकीर गिरीश महाजन कशाला करतील ? नाशिक हा त्यांचा मतदारसंघ थोडाच आहे ? जामनेर मध्ये कदाचित ते अचूक निर्णय घेतील. त्यातच मुख्यमंत्र्यांचा पूर्ण आशीर्वाद व हात डोक्यावर असल्यामुळे गिरीश महाजन जे करतील ती पूर्व दिशा आहे हे सत्ताधारी व विरोधकांनाही कळते. त्यामुळेच राजकारणात प्रचंड चलती असलेल्या गिरीश महाजनांच्या शब्दाला आता प्रचंड किंमत आली आहे. हे मूल्य जोपर्यंत आहे, तोपर्यंत अशा अनेक पक्षांतरांची सोहळे होत राहतील व विरोधक दुर्बल होत जातील. सीमा हिरे असतील, देवयानी फरांदे असतील किंवा राहुल ढिकले असतील तिघेही नाशिकचे आमदार आहेत. परंतु पक्षात कोणाला घ्यायचे व कोणाला काढायचे याचा निर्णय या तिघांना कधीही घेता येणार नाही व सरकारच्या विरोधात जाण्याची कुणात ताकदही नाही. त्यामुळे असे अनेक बडगुजर पक्षात येतच राहतील व त्यांना पायघड्या टाकाव्याच लागतील. एवढे करूनही जिल्ह्यात एखादे मंत्रीपद वाट्याला येईल, ती देखील शक्यता नाही. राज्याच्या राजकारणाचा इतका चिखल झाला आहे की, भाजपच्या नाशिक जिल्ह्यातील पाचही आमदारांना काहीच उमजायला तयार नाही. सीमाताई हिरे यांनी पत्रकार परिषदेत सुधाकर बडगुजर व त्यांच्या मुलाचे कारनामे सांगितले. त्यांचा संताप साहजिकच आहे. निवडणुकीच्या काळात त्यांनी त्रास सोसला आहे. परंतु आता दाऊद इब्राहिम, सलीम कुत्ता असे विषय सध्या कालबाह्य झाले आहेत. निवडणूक जवळ येतील त्यावेळी कदाचित असे विषय हाताळता येतील. प्रचंड बहुमत ज्यावेळी एखाद्या पक्षाकडे असते, त्यावेळी अशा घटना घडतच असतात. बडगुजरांना पक्षात घ्यायला नको म्हणून स्थानिक भाजपच्या नेत्यांनी कितीही प्रयत्न केले तरी बडगुजर एकटेच पक्षात येत नाही, ते मोठा लवाजमा घेऊन पक्षात येत आहे. त्यामुळे पक्षाची ताकद वाढणार हे निश्चितच. त्याबरोबरच पक्षात नव्याने येणाऱ्या सुधाकर बडगुजरांची ताकद वरिष्ठांना कळेल. त्यामुळे सीमाताई तुम्हाला आता शांत बसल्याशिवाय कोणताही पर्याय नाही व पुराणातील काव्याप्रमाणे 'तुका म्हणे आता जे जे होईल ते ते निमूटपणे पहा'!

